**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

***परिपत्रक क्र.कोविमं /माध्य. परीक्षा/ जुलै २०१९ /श्रेणी तक्ते/ 1023 / दिनांक ०७ जुलै, २०१९***

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **जुलै २०१९ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते(Grade List) OMR पध्दतीप्रमाणे** वितरण केंद्रावर **सोमवार दिनांक ०८/०७/ २०१९ रोजी** वितरीत करण्यात येणार आहेत. तरी सदरची पुनर्परीक्षार्थी (**Repeater**) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते बिनचूक भरुन ते **दिनांक १७ जुलै, २०१९** रोजी वितरण केंद्रावरील प्रतिनिधीकडे निर्धारित वेळेत हस्तपोहोच जमा करण्यात यावेत. उशीरा प्राप्त होणाऱ्या श्रेणीतक्त्याबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदरचे श्रेणीतक्ते इतर कोणत्याही पाकिटात न भरता कार्यालयाने पुरविलेल्या श्रेणीतक्त्याच्या पाकिटातच (Grade List पाकिटात) भरुन सदरचे श्रेणीतक्त्याचे पाकिट पाठवावे.** तसेच श्रेणीतक्त्याच्या पाकिटावर ठळक अंकात शाळेचा सांकेतिक क्रमांक लिहावा. श्रेणीतक्ते वेळेत जमा न केल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाचे कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

**श्रेणीतक्ते भरताना घ्यावयाची काळजी –**

१) **पुनर्परिक्षार्थी (REPETER) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते OMR पध्दतीने भरावयाची असल्यामुळे विद्यार्थ्यांना या पध्दतीनुसार श्रेणीतक्ते देण्यात आलेली आहेत. (अ)** सदरहू श्रेणीतक्त्यामध्ये हे P1 (Physical Education) & R7 (self development and art appre.) हे शालेय विषय सक्तीचे असल्यामुळे त्यांचे विषय कोड श्रेणी तक्त्यात नमूद केलेले आहेत. या विषयाच्या खालील चौकटीमध्ये आतील चौकटीला स्पर्श न करता खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. **(ब)** कार्यानुभव/शालेय वैकल्पिक विषयाची श्रेणी भरताना विषय क्रमांकासाठी २ चौकटी दिलेल्या आहेत. त्या २ चौकटीच्या आतील चौकटीला स्पर्श न करता विषय कोड दर्शविण्यात यावा व त्याच्यापुढील श्रेणी चौकटीच्या आतील चौकटीमध्ये खालीलप्रमाणे अंकामध्ये (**Numeric Code**) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. उदा.

| Index No | Grade Code |
|---|---|
| P 4 | 3 |

**२) पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणेच भरण्यात यावी. फक्त गैरहजर विद्यार्थ्यासाठी AA अशी श्रेणी नोंदविण्यात यावी.श्रेणी तक्ते भरताना कोणत्याही परिस्थितीत व्हाईटनरचा वापर करणेत येवू नये .**

३) श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे **सांकेतांक (Index No.)** नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादित केलेली **श्रेणी (Grade) अंकामध्ये (Numeric Code मध्ये) अचूक नोंदवाव्यात.** श्रेणीतक्त्यात श्रेणी नोंदविताना श्रेणी तक्त्याच्या खाली मुद्रित करण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन खालील प्रमाणे श्रेणीची नोंद करावी.

- **A ग्रेडसाठी — 3 (60% &above marks)**
- **B ग्रेडसाठी — 2 (45% & 59% marks)**
- **C ग्रेडसाठी — 1 (35% & 44% marks)**
- **D ग्रेडसाठी — 0 (35% & below marks)**
- **E ग्रेडसाठी — 4 (Exempted subject )**
- **गैरहजरसाठी विद्यार्थ्यासाठी — A**
- **अपंगासाठी (Handicapped) — 5 (फक्त शारिरीक शिक्षण व इतर विषयास श्रेणी द्यावी)**
- **मार्च २००८ पूर्वीचे परीक्षार्थी जुलै २०१९ च्या परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्यांना पूर्वी पर्यावरण (38) व व्यक्तिमत्व विकास (R6) विषय नसल्यामुळे या विषयासाठी <u>NN</u> श्रेणी दर्शवावी.**

**४) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे शालेय वैकल्पिक विषयास पास श्रेणी मिळून त्यांचा तो विषय सुटलेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे श्रेणीतक्ते भरताना त्या विषयापुढे <u>विषय सूटसाठी 4 (Exempted)</u> अशी श्रेणी दर्शवावी.**

**५) ज्या विद्यार्थ्यांना मार्च–१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेस व्यक्तिमत्व विकास (R6),समाजसेवा (P6),कार्यशिक्षण (P7),व्यवसाय मागदर्शन (R4),यापैकी एका विषयामध्ये सूट मिळालेली नाही अथवा विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमातील नव्यान समाविष्ट झालेला शालेय श्रेणी विषयातील स्व–विकास व कला रसास्वाद R7 हा श्रेणी विषय घेऊन पुढील परीक्षेस प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण व्हावे लागेल.**

**६) गैरहजर विद्यार्थ्यासाठी A व ३५% पेक्षा कमी श्रेणी दर्शविताना 0 श्रेणी लाल शाईने लिहाव्यात.** मात्र या श्रेणी लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यास ३५% पेक्षा कमी गुण व विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री करूनच श्रेणी लिहाव्यात. मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की निकालानंतर **0** व **A** श्रेणी दिलेला विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही केवळ या श्रेणी दिल्यामुळे त्यांचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होतो. निकालानतर शाळाप्रमुख श्रेणी दुरूस्ती व निकाल दूरूस्तीचा प्रस्ताव सादर करतात. निकालानंतर कोणत्याही श्रेणीमध्ये व निकालात बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्यास चूकीची श्रेणी दिल्यामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

5.7.19

**विभागीय सचिव**

**कोल्हापूरविभागीय मंडळ,कोल्हापूर**

**मार्च–१९ परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची ग्रेड लिस्ट देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**